फौ.कि.अ. क्र. ६८/२०२४
साक्षीदार क्र. १

**<u>सत्यापण</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | बप्पा नामदेव साळुंके |
| वय | - | ५५ वर्षे |
| व्यवसाय | - | शेती |
| रहाणार | - | गवडी, ता. भोर. जि. पुणे. |

मी गवडी येथील कायमचा रहिवासी आहे. गवडी फाटा ते वरची गवडी हा रस्ता प्र.जि.मा मार्ग १४२ म्हणून नियोजन मंडळाने मंजूर केलेला होता. त्यासाठी पंधरा लाख रुपयांचा तांत्रीकरित्या निधीची प्रशासकीय मान्यता मिळाली होती. सदरचा रस्ता बनवण्यासाठी ग्रामपंचायत ठेकेदाराने रक्कम काढली परंतु रस्ता तयार केला नाही. मी ग्रामपंचायत, पंचायत समिती व बांधकाम विभाग यांच्याकडे सदर रस्त्याबाबत चौकशी केली असता त्यांनी रस्ता झाला आहे असे उडवा उडवीचे उत्तर दिले. सदरचा १ किमी लांबी व २०० फुट रुंदीचा रस्ता तयार करण्यात आलेला नाही.

सदरचा रस्ता मंजूर करण्यासाठीचे कारण की, गावातील लोकांना रस्त्याची नितांत आवश्यकता होती. त्यामुळे नियोजन मंडळाने तसा ठराव पारित केला होता. सदर रस्ता न झाल्याने सर्व गावक-यांना त्याचा त्रास होत आहे. रस्त्यासाठी मंजूर निधीचा गैरवापर झालेला आहे. आम्ही पंचायत समितीचे विभागीय अधिकारी, बीडीओ यांना वारंवार संपर्क केलेला आहे परंतु त्यांनी चौकशी करतो, स्थळ पाहणी करतो असे म्हणून टाळले आहे. सदर प्रकरणाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच एस.पी यांना देखील पत्रव्यवहार केलेला आहे.

तरी आरोपींच्याविरुध्द योग्य ती कार्यवाही व्हावी.

साक्षीदार
(बप्पा नामदेव साळुंके)

समोर

NEHA K NAGARGOJE
Digitally signed by NEHA K NAGARGOJE
Date: 2024.08.31 15:21:02 +0530

( एन.के.नागरगोजे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोर, जि.पुणे

दिनांक - ३१.०८.२०२४.